पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक १६/०१/२०१९

# वार्तापत्र

दिनांक १६/०१/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा.च्या सुमारास मौजा गुरुपल्ली गावाजवळ आलापल्ली वरुन एटापल्ली -बुर्गी जाणारी बस व लोह खनिज वाहुन नेणारा ट्रक यांची समोरासमोर धडक होवुन त्यात बस मधील प्रवासी १) प्रकाश पत्रुजी अंबादे, वय ५० वर्ष, २) शामला प्रभाकर डोंगरे, वय ४७ वर्ष, ३) अमोल मुंडी गावडे, वय १७ वर्ष, ४) मंजुला सोमजी करपे, वय ४५ वर्ष हे मयत झाले झाले. सदर घटनेमुळे संतप्त झालेल्या गावक-यांनी या मार्गावरुन जाणारे सुमारे १० ते १५ ट्रकची तोडफोड व जाळपोळ केली. परंतु पोलीसांनी तातडीने पावले उचलत अपघातातील जखमींना उपचाराकरीता अहेरी व गडचिरोली येथील रुग्णालयात भरती केले. सदर घटनेमुळे तणावाचे वातावरण निर्माण होवू लागल्याने पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलीसांनी जमावास शांत करीत रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु केली व रस्त्यावर असणारे ६० ते ७० ट्रकांना जाळपोळ व तोडफोड होण्यापासुन वाचविले. सदर अपघाताच्या अनुषंगाने ट्रक चालक याचे विरुध्द पोलीस स्टेशन एटापल्ली येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन अपघातात ट्रक चालक सुध्दा जखमी झाल्याने त्यास उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे भरती करण्यात आलेले आहे. पोलीसांनी वेळीच कारवाई केल्याने सध्या परिस्थिती नियंत्रणात असुन परिसरात शातंता असुन वरिष्ठ पोलीस अधिकारी हे परिस्थीतीवर लक्ष ठेवून आहेत.